"बहुजन हिताय, बहुजन सुखाय"
श्री शिवाजी मराठा सोसायटीचे विधी महाविद्यालय, पुणे-२.
४२५, शुक्रवार पेठ, पुणे ४११००२.

दि. २७.१२.२०२५

# सूचना

**विषय : नववर्ष वाचन संकल्प व पुस्तक बँक उपक्रमात सहभागाबाबत...**

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना कळविण्यात येते की,नवीन वर्षाच्या स्वागताच्या निमित्ताने आपल्या महाविद्यालयामध्ये दिनांक १ जानेवारी रोजी "नववर्ष वाचन संकल्प व पुस्तक बँक" हा आगळा-वेगळा उपक्रम आयोजित करण्यात येत आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश वाचनसंस्कृती वृद्धिंगत करणे, एक पुस्तक – अनेक वाचक ही संकल्पना रुजवणे तसेच महाविद्यालयामध्ये पुस्तक बँक स्थापन करणे हा आहे.

**उपक्रमाचे स्वरूप :**

- सर्व उपस्थितांकडून वाचन संकल्पाचे सामूहिक वाचन.
- सर्वांनी (विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी) आपल्याकडील वाचलेली, चांगली व इतरांसाठी उपयुक्त किमान एक पुस्तक महाविद्यालयात दि. २९ डिसेंबर २०२५ पासून १ जानेवारी २०२६ पर्यंत जमा करणे.
- जमा झालेल्या पुस्तकांद्वारे पुस्तक बँक तयार करून पुस्तकांची देवाणघेवाण करणे.

**महत्त्वाच्या सूचना :**

- अभ्यासक्रमाव्यतिरिक्त (कथा, कादंबरी, आत्मचरित्र, चरित्र, प्रेरणादायी इ.) पुस्तके द्यावीत.
- पुस्तकाच्या पहिल्या पानावर देणाऱ्याचे नाव व विभाग / पद नमूद करावे.

तरी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या उपक्रमात उत्स्फूर्तपणे व आवर्जून सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

शेळके सागर २७/१२/२५.

प्राचार्य

डॉ.सागर शेळके

**प्रभारी प्राचार्य**
**श्री शिवाजी मराठा सोसायटीचे**
**विधी महाविद्यालय, पुणे-२**